# प्रकरण I

# परिचय

# प्रकरण I परिचय

## 1.1 परिचय

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, रोजगाराची हमी देत समाजातील सर्वात दुर्बल घटकांना उत्पन्न आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करण्याची सुनिश्चिती करत आर्थिक आणि सामाजिक न्यायाला चालना देतो. रोजगार हा केवळ विशेषाधिकार नसून सर्वांचा हक्क आहे, याची सुनिश्चिती करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम महत्त्वाचा आहे.

## 1.2 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, 2005 सप्टेंबर 2005 मध्ये भारत सरकारने अधिसूचित केला होता, ज्याला नंतर 2009 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम असे नाव देण्यात आले. ज्या ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्य स्वयंस्फूर्तीने अकुशल शारीरिक काम करतात, अशा प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला एका आर्थिक वर्षात किमान 100 दिवसांचा हमी मजुरी रोजगार उपलब्ध करून देऊन ग्रामीण जनतेची उपजीविका वाढविणे हे या अधिनियमाचे उद्‌दिष्ट आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 3 नुसार प्रत्येक राज्य शासनाने अधिनियमात नमूद केलेल्या हमीची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागासाठी रोजगार हमी योजना तयार करणे आवश्यक होते.

02 फेब्रुवारी 2006 पासून पहिल्या टप्प्यात देशातील 200 जिल्ह्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम अधिसूचित करण्यात आला होता, जो 2007-08 या आर्थिक वर्षात अतिरिक्त 130 जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आला. 01 एप्रिल 2008 पासून शंभर टक्के शहरी लोकसंख्या असलेले जिल्हे वगळता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम संपूर्ण देशाला लागू केला गेला.

शाश्वत विकासाचे उद्‌दिष्ट -1- दारिद्र्य निर्मूलन हे साध्य करण्यासाठी भारत सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेला 'प्रमुखातील प्रमुख' योजना म्हणून मान्यता दिली आहे.

## 1.3 महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाची उद्‌दिष्टे

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाची उद्‌दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- रोजगाराच्या संधी उपलब्ध करून ग्रामीण भारतात राहणाऱ्या सर्वात दुर्बल लोकांना सामाजिक संरक्षण;
- टिकाऊ मालमत्तेची निर्मिती, सुधारित जल सुरक्षा, मृद संधारण आणि जमिनीची उत्पादकता वाढवून गरिबांसाठी उपजीविकेची सुरक्षा;
- ग्रामीण भारतातील दुष्काळ निवारण व पूर व्यवस्थापन;

- सामाजिकदृष्ट्या वंचित, विशेषत: महिला, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे अधिकार-आधारित कायद्याच्या प्रक्रियेद्वारे सक्षमीकरण;
- दारिद्र्य निर्मूलन आणि उपजीविकेच्या विविध उपक्रमांच्या एकत्रीकरणाद्वारे विकेंद्रित, सहभागात्मक नियोजन बळकट करणे;
- पंचायतराज संस्था बळकट करून तळागाळातील लोकशाही मजबूत करणे;
- प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करणे.

## 1.4 महाराष्ट्र राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाचा अवलंब

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 28 नुसार ग्रामीण कुटुंबांना अकुशल अंगमहनतीच्या कामासाठी रोजगार हमी देण्यासाठी अस्तित्वात असलेल्या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचा पर्याय राज्य शासनाकडे होता, जर तो महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असेल.

महाराष्ट्रात, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम 1977 मध्ये लागू करण्यात आला, ज्याचा उद्देश महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागात अकुशल अंगमहनतीचे काम करण्यासाठी स्वेच्छेने काम करणाऱ्या सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन कामाचा अधिकार सुरक्षित करणे हा होता.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम 28 नुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 मध्ये वेळोवेळी सुधारणा करून ती महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत केली. या सुधारित अधिनियमाला महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अधिनियम, 2014 असे नाव देण्यात आले आहे. महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अधिनियमाच्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या रोजगार हमी योजनेचे (जानेवारी 1979) नाव बदलून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना असे करण्यात आले (जुलै 2011).

36 जिल्ह्यांपैकी मुंबई आणि मुंबई उपनगर हे पूर्ण नागरीकरण झालेले जिल्हे वगळता राज्यातील 34 जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात आली. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला एका आर्थिक वर्षात किमान 100 दिवसांच्या रोजगाराची हमी देते ज्यांचे प्रौढ सदस्य स्वयंस्फूर्तीने अकुशल अंगमहनतीचे काम करतात, तर महाराष्ट्र शासन राज्य निधीद्वारे 100 दिवसांपेक्षा जास्त कामगारांना अकुशल रोजगाराची हमी देते.

## 1.5 योजनेचा आढावा

योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा **आलेख 1.1** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 1.1: राज्यातील योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा**





## 1.6 संघटनात्मक रचना


महाराष्ट्र शासनाचा नियोजन विभाग (रोजगार हमी योजना) हा प्रशासकीय विभाग असून नागपूर येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आयुक्तांमार्फत राज्यात ही योजना राबवितो. प्रधान सचिव (रोजगार हमी योजना) यांच्या अंतर्गत कार्यरत असलेले संचालक, सामाजिक अंकेक्षण हे ग्राम पंचायतींच्या सामाजिक अंकेक्षणासाठी जबाबदार असतात. योजनेच्या अंमलबजावणी आणि देखरेखीमध्ये विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त, जिल्ह्यात जिल्हाधिकारी, तालुक्यात तहसीलदार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी आणि ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांचा सहभाग असतो.

राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरावरील संघटनात्मक रचना **आलेख 1.2** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 1.2: योजनेच्या अंमलबजावणीसाठी संघटनात्मक रचना**



## विभागीय व जिल्हास्तरीय रचना



## 1.7 भूमिका आणि जबाबदाऱ्या

राज्य शासनाने जिल्हाधिकारी यांना जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्ह्यांमध्ये योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा कार्यक्रम सहसमन्वयक म्हणून नियुक्त केले (ऑक्टोबर 2006).

मुख्य हितैषींच्या महत्त्वपूर्ण भूमिका आणि जबाबदाऱ्या **तक्ता 1.1** मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता 1.1: मुख्य हितैषींच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या**


| पातळी | नियुक्त केलेले अधिकारी | भूमिका आणि जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| राज्य | सचिव, रोजगार हमी योजना | नियमित देखरेख आणि कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी राज्य परिषदेची स्थापना करणे, रोजगार हमी निधीची स्थापना करणे, जिल्हा कार्यक्रम समन्वयक आणि कार्यक्रम अधिकारी यांना आवश्यक कर्मचारी आणि तांत्रिक कर्मचारी उपलब्ध करून देणे, निधी वितरणाचे आदेश जारी करणे, योजनेच्या अंमलबजावणीसाठी सूचना जारी करणे. |
| | आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर | जिल्हा कार्यक्रम समन्वयकांबरोबर समन्वय साधणे, जिल्हा वार्षिक कृती आराखडा आणि कामगार अर्थसंकल्प एकत्रित करणे, रोजगार हमी निधीचा हिशेब ठेवणे, भारत सरकारला उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे. |
| जिल्हा | जिल्हाधिकारी | योजनेनुसार जिल्हा स्तरावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार, योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करणे, अर्जदारांच्या तक्रारींचे निवारण करणे. |
| | जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी | योजनेच्या अंमलबजावणीत जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला मदत करणे, वार्षिक कृती आराखडा आणि मजूर अर्थसंकल्पास मान्यता देणे, तालुका आणि जिल्हा स्तरावर हाती घेतलेल्या प्रकल्पांचे पर्यवेक्षण आणि देखरेख करणे; |
| गट/तालुका | गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना सहकार्यक्रम अधिकारी व कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, तालुका कृषी अधिकारी, वन परिक्षेत्र | कार्यक्रम अधिकारी आणि सहकार्यक्रम अधिकारी पंचायत समितीला योजनेअंतर्गत कार्ये पार पाडण्यासाठी सहाय्य करतात, ग्रामपंचायती आणि इतर अंमलबजावणी संस्थांनी हाती घेतलेल्या प्रकल्पांचे निरीक्षण करतात. पात्र कुटुंबांना बेरोजगारी भत्ता देणे, योजनेंतर्गत कार्यरत सर्व मजुरांना त्वरित व रास्त मजुरी देणे, सामाजिक अंकेक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांवर त्वरित कारवाई करणे, योजनेच्या अंमलबजावणीत उद्भवणाऱ्या सर्व तक्रारींची त्वरित दखल घेणे ही गटविकास अधिकारी व तहसीलदार यांची जबाबदारी आहे. |

| पातळी | नियुक्त केलेले अधिकारी | भूमिका आणि जबाबदाऱ्या |
| --- | --- | --- |
| | अधिकारी आणि सामाजिक वनीकरणाचे अधिकारीही कार्यक्रम अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते. | |
| ग्रामपंचायत | ग्राम विकास अधिकारी /ग्रामसेवक | ग्रामसभेच्या शिफारशींचा विचार करून ग्रामपंचायतीमधील प्रकल्पांची ओळख पटविणे, विकास आराखडा तयार करणे आणि संभाव्य कामांचा संग्रह राखणे, अर्जदाराला कामाचे वाटप करणे आणि जॉब कार्डस जारी करणे या जबाबदाऱ्या त्यांच्यावर आहेत. |
| | ग्राम रोजगार सहाय्यक | नोंदणी, जॉब कार्डसचे वितरण, रोजगाराच्या अर्जावर तारखेनुसार पावत्या प्रदान करणे, अर्जदारांना कामाचे वाटप, ग्रामसभेच्या सभा आणि सामाजिक अंकेक्षणाची सुविधा देणे, कामगारांची उपस्थितीची नोंद करणे, जॉब कार्डस अद्ययावत करणे या प्रक्रियेवर देखरेख ठेवणे. |

## 1.8 निधीचे प्रारूप

ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत योजना म्हणून भारत सरकार आणि राज्य शासन यांच्यात खर्च वाटून घेण्याच्या आधारावर राबविण्यात येत आहे. अकुशल कामगारांच्या मजुरीचा संपूर्ण खर्च आणि कुशल आणि अकुशल कामगारांच्या मजुरीसह (साहित्य घटक) साहित्याच्या किमतीच्या 75 टक्के पर्यंत भारत सरकार उचलते. राज्य शासन साहित्याच्या किमतीच्या 25 टक्के खर्च उचलते. कामगारांना मजुरी देण्यास विलंब झाल्यास भरपाई भत्ता, बेरोजगारी भत्ता आणि राज्य रोजगार हमी परिषदांच्या प्रशासकीय खर्चाचा एकूण खर्च देखील राज्य शासन उचलते. या योजनेअंतर्गत भारत सरकार आणि राज्य शासन यांच्यातील निधीचे स्वरूप **आलेख 1.3** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 1.3: भारत सरकार आणि राज्य शासन यांच्यातील योजनेअंतर्गत निधीचे प्रारूप**




2019-20 ते 2023-24 दरम्यान या योजनेंतर्गत राज्यात ₹ 13,518.30 कोटी खर्च करण्यात आला.

## 1.9 व्यवस्थापन माहिती प्रणाली (नरेगासॉफ्ट)

राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राने ग्रामीण विकास मंत्रालयाच्या सहकार्याने नरेगासॉफ्ट म्हणून ओळखले जाणारे एक कार्यप्रवाह आधारित, वेब-सक्षम अनुप्रयोग विकसित केले आहे जे योजनेच्या अंमलबजावणीतील सर्व व्यवहार आणि विविध प्रक्रियांचे तपशील सादर करते. नरेगासॉफ्ट कामगारांचे तपशील जसे की नाव, पत्ता, बँक खाते क्रमांक इत्यादी, जॉब कार्ड तपशील, कामाच्या अंमलबजावणीचे तपशील जसे की कामाचे अंदाजपत्रक, कामाची प्रत्यक्ष प्रगती, साहित्य आणि मजुरांवरील खर्च, देय मजुरी, देय बेरोजगारी भत्ता इत्यादी नोंदित करते.

नरेगासॉफ्ट अंमलबजावणी संस्थांना महत्वाचे व्यवहार, विविध स्पष्ट अनियमितता इत्यादींची माहिती देऊन जागरूकता देखील निर्माण करते आणि आवश्यक ती सुधारणात्मक कारवाई जलदगतीने करणे ही अंमलबजावणी संस्थांची जबाबदारी आहे.

## 1.10 जिओ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम


पारदर्शकता सुधारण्याच्या आणि कार्यक्रम अधिक सुस्पष्ट होण्याच्या उद्देशाने, ग्रामीण विकास मंत्रालयाने भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या राष्ट्रीय दूरस्थ संवेदन केंद्राच्या भागीदारीत योजनेअंतर्गत तयार केलेल्या मालमत्तेच्या भौगोलिक चिन्हांकनासाठी जिओ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी सुरू केली. जिओ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाद्वारे, भ्रमणध्वनी आधारित छायाचित्र भौगोलिक चिन्हांकन आणि ऑनलाइन नोंदी आणि देखरेखीसाठी भौगोलिक माहिती प्रणाली सारख्या तांत्रिक हस्तक्षेपांचा वापर करून मालमत्तेसंबंधी पद्धतशीर विदा तयार करण्यात आला आहे. या उद्देशासाठी दूरस्थ संवेदन केंद्राचे भुवन जिओपोर्टल आवश्यकतेनुसार तयार केले गेले आहे. प्रत्येक मालमत्तेच्या स्थानाचे भौगोलिक चिन्हांकन दोन छायाचित्रांसह केले जाते. मालमत्तेचे भौगोलिक चिन्हांकन तीन टप्प्यात केले जाते, म्हणजे काम सुरू होण्यापूर्वी, (टप्पा-I), कामाच्या दरम्यान (टप्पा-II) आणि पूर्ण झाल्यानंतर (टप्पा-III).

विदाची अखंडता/सत्यता आणि सुरक्षितता सुनिश्चित करताना, नरेगासॉफ्ट आणि भुवन जिओपोर्टल दरम्यान सेवा म्हणून विदेची सुरळीत देवाणघेवाण करण्यासाठी, एक कार्यपद्धती स्थापित करण्यात आली आहे.

## 1.11 राज्यातील रोजगार मिळवणाऱ्या कुटुंबांचा कल

2019-24 दरम्यान महाराष्ट्रातील नोंदणीकृत कुटुंबांच्या तुलनेत रोजगार मिळालेल्या कुटुंबांच्या टक्केवारीचा सर्वसाधारण कल **आलेख 1.4** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 1.4: नोंदणीकृत कुटुंबांच्या तुलनेत रोजगार घेतलेल्या कुटुंबांच्या टक्केवारीचा जिल्हानिहाय कल**




*स्त्रोत: नरेगासॉफ्टवरून डाऊनलोड केलेल्या विदावर आधारित संकलित (ऑक्टोबर 2024)*

**आलेख 1.4** नुसार, ही योजना पूर्व महाराष्ट्रात अधिक लोकप्रिय आहे, नोंदणीकृत कुटुंबांच्या तुलनेत गोंदिया जिल्ह्यात रोजगार मिळालेल्या कुटुंबांची सर्वाधिक टक्केवारी नोंदवली गेली आहे, तर पुणे जिल्ह्यात सर्वात कमी सहा टक्के आहे.